नियमीत दिवाणी दावा क्रं. ५५/२०१८
मकरंद **विरुध्द** राजेश व ईतर

# निशाणी क्रमांक ५ व १३ वरील आदेश

(दिनांक २३/१०/२०१८)

गैरअर्जदारांनी अथवा त्यांचे मार्फत इतर कोणीही मौजे लोणी येथील शेत सर्व्हे कमांक १३०/१० मधुन दक्षिणे कडील धु-या लगत असलेल्या अर्जदाराच्या शेत सर्व्हे नंबर १३२/१ व १३२/२ करीता असलेली ट्रक, ट्रॅक्टर व बैलबंडीची पुर्व पश्चिम रस्त्याची वहिवाट (यापुढे संक्षेपाकरीता ''वादातील रस्ता'' असे संबोधण्यात येईल) दाव्याचा निकाल लागेस तोवर बंद करु नये याकरीता अर्जदाराने सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ नुसार गैरअर्जदारां विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे म्हणने असे आहे की, तो व गैरअर्जदार एकाच गावचे रहिवाशी असुन गैरअर्जदार कमांक १ ते ४ हे मयत रामकृष्ण अंबादास चिंचमलातपुरे यांचे मुले आहेत. तसेच गैरअर्जदार कमांक ५ हि रामकृष्ण अंबादास चिंचमलातपुरे यांची पत्नी आहे. सर्व गैरअर्जदार हे मयत रामकृष्ण अंबादास चिंचमलातपुरे यांचे कायदेशिर वारस आहेत. गैरअर्जदार कमांक १ याने आपल्या शेतातुन अर्जदाराच्या शेताकरीता असलेला वहिवाटी रस्ता तारेचे कुंपण घालुन बंद करण्याचा प्रयत्न केल्यामुळे वादातील रस्ता गैरअर्जदाराच्या शेतामधुन असल्याचे घोषीत करुन मिळण्याकरीता तसेच त्या अनुषंगाने गैरअर्जदाराने किंवा त्यांच्या वतीने ईतरांनी अर्जदाराचा वहिवाटी रस्ता बंद करु नये या करीता अर्जदाराने प्रस्तुत दावा दाखल केला आहे.

३. अर्जदाराने मौजा लोणी येथील शेत सर्व्हे कमांक १३२/२ हे. आर ०.९७ दिनांक ०१/०८/२०१६ रोजी दस्त कमांक २४६१/१६ प्रमाणे पंजीबध्द खरेदीखताने अभिजीत चिंचमलातपुरे यांच्याकडुन रस्त्याच्या वहिवाटी हक्कासह विकत घेतला आहे तसेच अर्जदाराकडे त्याच्या वडिलांच्या नावे असलेली याच शेत शिवारातील अर्जदाराच्या शेतास लागुन पश्चिमेकडील शेत जमीन सर्व्हे नंबर १३२/१ हे.आर ०.९२ हि वहितीत व ताब्यात आहे. मयत रामकृष्ण यांच्या नावे असलेले शेत सर्व्हे नंबर १३०/१० हे.आर ६७ हि शेत जमीन अर्जदाराच्या शेताच्या पश्चिमेस आहे. रामकृष्ण यांच्या मृत्युनंतर वारसाने ती गैरअर्जदारांच्या मालकीची आहे. गैरअर्जदार कमांक १ हा इतर गैरअर्जदारांच्या वतीने सदर जमिनीची वहिती करतो.

४. सदर गैरअर्जदारांच्या शेत सर्व्हे नंबर १३०/१० मधुन दक्षिणेकडील धु-यालगत ट्रक, ट्रॅक्टर व बैलबंडीच्या वहिवाटीचा पुर्व पश्चिम रस्ता अर्जदाराच्या दोन्ही शेता करीता गेल्या ३७ ते ४० वर्षा पेक्षा कालावधीपासुन उपलब्ध आहे. त्यामुळे अर्जदाराला त्याच्या दोन्ही शेताकरीता भारतीय वहिवाटी कायदयाच्या प्रावधाना अंतर्गत easement by prescription प्रमाणे वहिवाट करण्याचा हक्क आहे. रामकृष्ण व त्यांच्या भावाचे शेत सर्व्हे नंबर १३० जमीन होती. त्यापैकी सर्व्हे नंबर १३०/१० च्या उत्तरेस लागुन असलेली शेत जमीन सर्व्हे नंबर १३०/९ हि केशव नामदेवरा मेंढे यांनी रामकृष्ण यांच्या भावाकडुन विकत घेतली आहे. तसेच शेत सर्व्हे नंबर १३०/७ हि वसंत चिंचमलातपुरे यांच्या मालकीची आहे. रामकृष्ण यांच्या शेताच्या दक्षिणेकडील धु-या लगत शेत सर्व्हे नंबर १३२/१ व १३२/२ करीता वहिवाटी रस्ता असल्याकारणाने त्यांच्या वाटणीत ०.६७ आर

क्षेत्रफळाची शेत जमीन आली. तसेच शेत सर्व्हे नंबर १३०/७ मधे सामुहिक विहीर असल्या कारणाने ती वाटणी मध्ये ०.६५ आर एवढी देण्यात आली होती. तसेच शेत सर्व्हे नंबर १३०/९ मध्ये वहिवाटी रस्ता किंवा विहीर नसल्याने त्याची वाटणी ०.५८ आर आली होती.

५. दिनांक १३/०५/१९८५ रोजी नारायण पांडुरंग उमेकर यांनी शेत सर्व्हे नंबर १३२/२ हि अण्णा बाळकृष्ण चिंचमलातपुरे यांना दस्त क्रमांक ११८२/८५ ने विकली. सदर दस्ताप्रमाणे सर्व्हे नंबर १३२/२ करीता गैरअर्जदारांच्या शेत सर्व्हे नंबर १३०/१० च्या दक्षिणेकडुन धु-यालगत वहिवाटी हक्क नमुद करण्यात आला आहे व याच रस्त्याने शेत विकत घेणार अण्णा चिंचमलातपुरे यांनी वहिवाट करावी असे नमुद आहे. अण्णा चिंचमलातपुरे यांचे नातु अभिजीत चिंचमलातपुरे यांच्या जवळुन अर्जदाराने दिनांक ०१/०८/२०१६ रोजी सर्व्हे नंबर १३२/२ पंजीबध्द खरेदीखताने वहिवाटी रस्त्याच्या हक्कासह विकत घेतले. गैरअर्जदार क्रमांक १ ने शेत सर्व्हे नंबर १३०/१० च्या केवळ पश्चिमेकडील धु-या लगत तारेचे कुंपन घालुन अर्जदाराची वहिवाट बंद करण्याचा प्रयत्न सर्व प्रथम दि.०९/०६/२०१८ रोजी केला. त्याबाबत अर्जदाराने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. परंतु प्रस्तुत प्रकरण दिवाणी असल्याने प्रस्तुत दावा दाखल करुन अर्जदाराने त्याची बाजु सकृतदर्शनी शाबीत केली आहे. तसेच अनुकुलतेचा कल त्याच्याच बाजुने आहे. त्यामुळे त्याने अशी विनंती केली की, या दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत गैरअर्जदारांनी त्यास वाद रस्त्याने वहिवाट करण्यास कोणत्याही प्रकारे अडथळा किंवा मनाई करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात यावा. प्रस्तुत अर्ज नामंजुर झाल्यास अर्जदाराचे अपरिमीत नुकसान होईल.

६. गैरअर्जदारांनी आपला जबाब व प्रतिदावा (नि.क.१२) प्रमाणे दाखल करुन अर्जदाराचे संपुर्ण कथन नाकबुल केले. तसेच गैरअर्जदारांनी नि.क.१३ वर तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरीता अर्ज दाखल केला.

७. गैरअर्जदारांचे कथन असे आहे की गैरअर्जदार कमांक २, ४ व ५ हे अमरावती येथे राहत असुन त्यांच्या वर दावा संमसची बजावणी झालेली नाही. केवळ गैरअर्जदार कमांक ३ ला त्यांचे दावा समंस तर्फे म्हणुन देण्यात आले आहे. गैरअर्जदार कमांक १ ते ४ हे सख्खे भाउ असुन गैरअर्जदार क्रमांक ५ हि त्यांची आई आहे. मौजा लोणी येथील शेत सर्व्हे नंबर १३० हि शेत जमीन चिंचमलातपुरे कुटुंबाची आहे. मौजा लोणी येथील शेत सर्व्हे नंबर १३०/१० हे.आर ०.६५ हि शेत जमीन गैरअर्जदार कमांक १ ते ४ चे वडीलांच्या हिस्यावर आली होती. गैरअर्जदार कमांक १ व ३ चे संयुक्त मालकीची व ताब्यातील शेत सर्व्हे नंबर १३०/१० चे उत्तरेला राजेराम चिंचमलातपुरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३०/९ हि शेत जमीन होती. ती त्यांनी केशवराव मेंढे यांना विकली आहे. तसेच केशवराव मेंढे यांच्या उत्तरेला सहदेवराव चिंचमलातपुरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३०/८ हि शेत जमीन असुन त्याचे उत्तरेला वसंत चिंचमलातपुरे यांची शेत सर्व्हे नंबर १३०/७ हे शेत असुन त्याच्या उत्तरेला सुजाता चिंचमलातपुरे हिचे शेत सर्व्हे नंबर १३०/५ आहे. त्याचे उत्तरेला सरिता चिंचमलातपुरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३०/५ आहे व त्यामध्ये शेत सर्व्हे नंबर १३०/१ व १३०/३ हे विलीन झालेले आहे. सदर शेत जमीनीचे उत्तरेला भास्कर चिंचमलातपुरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३०/२ हि शेत जमीन आहे. वरील शेत जमीनीतुन जाण्यायेण्याकरीता लोणी अलोडा रस्त्याने येवुन उत्तरेकडील शासकीय पडीत जागेमधुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे येवुन त्यानंतर मारोती देवस्थानची

शेत सर्व्हे नंबर १२९/२ दक्षिणेकडील धु-याने शेताच्या आतुन पश्चिमेकडुन पुर्वे कडे गैरअर्जदारांचे शेत सर्व्हे नंबर १३०/१० मध्ये आल्यानंतर पुढे शेत सर्व्हे नंबर १३०/१० चे पश्चिमेकडे धु-याने शेताच्या आतुन दक्षिणेकडून उत्तरेकडे बैलबंडीचा ट्क्टरचा जाण्यायेण्याचा शेत सर्व्हे १३० चे संपुर्ण पोट हिस्सेदारांचा रस्ता आहे. सदरहु बैलबंडीचा रस्ता सोडल्यानंतर गैरअर्जदारांचे शेत सर्व्हे नंबर १३०/१० चे पश्चिम धु-याला शेताच्या आतमधुन दक्षिण उत्तर पुर्वापार तारेचे कुंपण आहे. तसेच गैरअर्जदारांचे शेताचे पश्चिमेकडील दक्षिण कोप-यामध्ये वरळी आहे.

८. गैरअर्जदारांचे शेत सर्व्हे नंबर १३०/१० व दक्षिणेकडील शामराव भानजी उघउे यांचे शेत सर्व्हे नंबर १३९/१ चे जोड धु-यावर चार मोठी निंभाची व दोन चंदनाची तसेच इतर जातीची मोठी ६० ते ७० वर्षे वयाची झाडे आहेत. तसेच शेत सर्व्हे नंबर १३९/१ चे उत्तरेकडील पुर्व पश्चिम धु-याला पुर्वापार तारेचे कुंपन आहे. गैरअर्जदारांच्या शेताच्या दक्षिणेला शामराव उघडे यांचे शेत सर्व्हे नंबर १३९/१ व अनिल उघडे यांचे शेत सर्व्हे नंबर १३९/१अ या शेत जमीनी आहेत. तसेच शेत सर्व्हे नंबर १३९/१अ हि अनील व सुनील उघडे यांनी महादेव मालपे कडुन विकत घेतली आहे. त्याच्या पुर्व धु-याला लागुन रमेश पाचघरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३३/३ असुन त्याच्या पुर्वेला गंगुबाई मेंढे हिचे शेत सर्व्हे नंबर १३३/१अ आहे. शेत सर्व्हे नंबर १३२ हि उमेकर कुटुंबाची आहे. त्यांच्या ४० ते ५० वर्षापुर्वी आपसी वाटण्या झाल्या आहेत. अर्जदाराचे वडिलोपार्जीत शेत जमीनीचा शेत सर्व्हे नंबर १३२/१ असुन त्याच्या पुर्वेचा हिस्सा सर्व्हे नंबर १३२/२ हा नारायण उमेकर यांचा होता व अर्जदाराने तो विकत घेतला आहे. त्याच्या पुर्वे कडील शेत सर्व्हे नंबर १३२/३ हा भदुजी उमेकर यांचा आहे व त्याच्या

पुर्वेचा शेत सर्व्हे नंबर १३२/४ हा बंशी उमेकर म्हणजेच आजचे मोहन उमेकर यांचा आहे. त्याच्या पुर्वेला शेत सर्व्हे नंबर १३२/५ हा सदाशिव उमेकर म्हणजेच आजचे जगदीश उमेकरचा आहे. वरील संपुर्ण शेत सर्व्हे नंबर १३२ मधील उमेकर कुटुंब हे लोणी अलोडा रस्त्याने आल्यानंतर रमेश पाचघरे, गंगुबाई नामदेव मेंढे व शेत सर्व्हे नंबर १३२ चे जगदीश उमेकर यांच्या शेताचे पुर्व धु-याला लागुन दक्षिण उत्तर लोणी अलोडा पांधन रस्ता गेलेला आहे. या रस्त्याने ट्क व ट्॑क्टरची शेत सर्व्हे नंबर १३२, १३१ व त्यापुढील संपुर्ण कास्तकारांची आपआपल्या शेत जमिनीमध्ये जाण्यायेण्याची वहिवाट आहे. जगदीश उमेकर सोबत त्याचे काकाचा कौटुंबिक वाद झाला होता व त्यावरुन जगदीशने रस्ता अडविण्याचा प्रयत्न केला असतांना तहसिल कार्यालयाने आदेश करुन जगदीशला शेत सर्व्हे नंबर १३२ मधील पोट हिस्सेदारांचा रस्ता अडविण्यास मनाई केली होती. याच रस्त्याने अर्जदार त्याचे शेत सर्व्हे नंबर १३२/१ ची दैनंदीन बैलबंडीच्या रस्त्याची वहिती करीत आहे. तसेच शेत सर्व्हे नंबर १३२/२ चे मुळ मालक नारायण व हरिभाउ उमेकर त्याच रस्त्याने वहिती करीत होते.

९. गैरअर्जदारांच्या शेत जमीनीमधुन अर्जदाराने दाव्यात नमुद केल्याप्रमाणे कधीही बैलबंडीचा, ट्क व ट्॑क्टरचा रस्ता नव्हता व नाही. तसेच अर्जदाराने शेताच्या जोड धु-यावरुन मागणी केल्याप्रमाणे मोक्यावर रस्ता अस्तित्वात नव्हता व नाही. अण्णा चिंचमलातपुरे यांनी सन १९८५ चे खरेदीखतामध्ये पुर्ण पणे चुकीचा व खोटा रस्ता लिहुन घेतला होता व अभिजीत याने अर्जदाराला दिनांक ०१/०८/२०१६ चे खरेदीखतामध्ये देखील पुर्णपणे चुकीचा व खोटा रस्ता लिहुन दिला आहे. अर्जदाराने शामराव उघडे व मारोती देवस्थान यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्ष सामील केले नाही.

अर्जदाराने प्रथमदर्शनी त्याची बाजु शाबीत केली नाही. अर्जदाराची मागणी मान्य झाल्यास गैरअर्जदारांचे भविष्यात कधीही भरुन न येणारे अपरिमीत नुकसान होईल. सबब, अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे गैरअर्जदारांचे शेतामधुन कधीही बैलबंडीचा रस्ता अस्तित्वात नव्हता व आजही नाही. त्यामुळे त्यांनी अर्जदाराचा अर्ज खर्चासह फेटाळुन लावण्याची विनंती केली आहे.

१०. गैरअर्जदार कमांक १ व ३ यांच्या प्रतिदाव्यास व तात्पुरता मनाई हुकूमाच्या अर्जास अर्जदाराने आपला लेखी जबाब ( नि.क.१५ ) दाखल केला. त्यामध्ये अर्जदाराने गैरअर्जदारांची संपुर्ण कथने नाकारली. अर्जदाराचे कथन असे आहे की, गैरअर्जदारांनी प्रतिदाव्यासोबत दाखल केलेला नकाशा चुकीच्या तथ्यावर व परिस्थितीशी विपरीत दाखल केलेला आहे. अर्जदारास गैरअर्जदार कमांक २, ४ व ५ अमरावती येथे नेमके कोठे राहतात याबाबत कल्पना नाही. परंतु संपुर्ण गैरअर्जदार हे एकत्रीत कुटुंबाचे सदस्य असुन गैरअर्जदार कमांक २, ४ व ५ च्या वतीने गैरअर्जदार कमांक ३ ने दाव्याचे व तात्पुरता मनाई हुकूमाची नोटीस व समंस स्विकारलेले आहे. वास्तवीक शेत सर्व्हे नंबर १३० च्या पश्चिमेस ११ फुट रुंद पांधन रस्ता मोक्यावर उपलब्ध आहे. या पांधन रस्त्याने जावुनच इतर शेतकरी आपआपल्या शेताची वहिवाट करतात. गैरअर्जदार कमांक १ ने सर्व्हे नंबर १३०/१० चे पश्चिम धु-याला शेताच्या आतुन दक्षिण उत्तर तारेचे कुंपन प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर टाकुन अर्जदाराचा रस्ता बंद करण्याचे प्रयत्न कले आहेत. गैरअर्जदाराचे शेताच्या पश्चिमेकडुन दक्षिण कोप-यामध्ये अत्यल्प वरळी जरी असली तरी शेत सर्व्हे नंबर १३०/१० मध्ये

जाण्यासाठी याच ठिकाणावरुन अर्जदार व गैरअर्जदारांचा आपआपल्या शेतामध्ये जाण्याचा रस्ता आहे. अर्जदाराच्या शेताकरीता असलेला रस्ता गैरअर्जदाराच्या शेत सर्व्हे नंबर १३०/१० च्या आतुन दक्षिणेकडील धु-यालगत असल्याने सदर दक्षिणेकडील धु-यावर झाडे असली तरी अर्जदाराच्या वहिवाटी रस्त्याला सदर झाडांचा कुठलाही अडथळा नाही. गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या शेताकरीता दर्शविलेली पर्यायी वहिवाट हि मोक्यावर उपलब्ध नाही. हल्ली गैरअर्जदार हे अर्जदाराच्या रस्त्यावर नांगरणी करुन ते पेरण्याच्या तयारीत आहे. गैरअर्जदारांनी त्यांची बाजु सकृत दर्शनी शाबीत केलेली नाही तसेच अनुकुलतेचा कल त्यांच्या बाजुने नाही व गैरअर्जदारांचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर झाल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदारांचा प्रतीदावा व तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

११. अर्जदारातर्फे विद्वान वकील श्री.वाय.एन.नागले तसेच गैरअर्जदारांतर्फे विद्वान वकील श्री.व्हि.जी.मालपे यांचा युक्तिवाद ऐकला.

अर्जदाराचे विद्वान वकील श्री. नागले यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदाराने दाव्या सोबत दाखल केलेल्या नकाशा वरुन अर्जदारास गैरअर्जदारांचे शेत सर्व्हे नंबर १३०/१० मधुन दक्षिणेकडील धु-या लगत वहिवाटीचा पुर्व पश्चिम रस्ता असल्याचे स्पष्ट होते. अर्जदारास त्याच्या शेत सर्व्हे नंबर १३०/१ व १३२/२ करीता गेल्या ३५ ते ४० वर्षा पेक्षा जास्त कालावधीपासुन सदर रस्ता उपलब्ध आहे. सदर बाब लगतच्या शेतक-यांनी देखील शाबीत केली आहे. त्याबाबत त्यांचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच खरेदीखत कमांक २४६१/१६ व ११८२/८५ वरुन देखील

अर्जदारास वाद रस्त्याने जाण्याचा अधिकार असल्याचे शाबीत होते. गैरअर्जदार हे जाणीव पुर्वक अर्जदाराच्या वहिवाटीस अडथळा आणत आहेत. न्यायालयीन आयुक्त यांनी देखील त्यांच्या अहवालामधुन गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या रस्त्यावर तारेचे कुंपन टाकुन अडथळा आणल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराने त्याची बाजु पुराव्यानिशी शाबीत केली आहे. तसेच अनुकुलतेचा कल त्याच्या बाजुने आहे. प्रस्तुत अर्ज नामंजुर झाल्यास त्याचे अपरिमीत नुकसान होईल. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत नि.क.७ वरील अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

याउलट, गैरअर्जदारांचे विद्वान वकील श्री.मालपे यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदाराने भारतीय वहिवाट कायदा कलम १७ नुसार तो वाद रस्त्याचा वापर विनाअडथळा २० वर्षा पेक्षा जास्त कालावधी पासुन करीत असल्याचे शाबीत केलेले नाही. तसेच अर्जदाराने शेत सर्व्हे नंबर १२९/२ व १३९/१ च्या मालकास प्रस्तुत दाव्यात समाविष्ट केलेले नाही. अर्जदाराने वाद रस्त्याचा उल्लेख खरेदीखत कमांक २४६१/१६ व ११८२/८७ मध्ये खोटा व चुकीचा केलेला आहे. अर्जदाराने नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदारांचे शेत सर्व्हे नंबर १३०/१० मधुन वाद रस्ता उपलब्ध नाही. गैरअर्जदारांनी त्यांच्या वतीने लगतच्या शेतक-यांचे शपथपत्र दाखल केले. अर्जदाराने त्याची बाजु सकृत दर्शनी शाबीत केलेली नाही. तसेच अनुकुलतेचा कल त्याच्या बाजुने नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत नि.क.७ वरील अर्ज नामंजुर व नि.क.१३ वरील अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

१२. अर्ज (नि.क्र.५ व १३) व त्यावरील म्हणणे/लेखी कैफियतीवरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्षांचे मी कारणमिमांसेसह विवेचन करीत आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराने त्याच्या अर्जातील कथने सकृतदर्शनी सिध्द केले आहेत काय? | ..... | होय. |
| १अ) | गैरअर्जदारांनी त्यांच्या अर्जातील (नि.क्र.१३) कथने सकृतदर्शनी सिध्द केले आहेत काय? | ..... | नाही. |
| २) | अनुकूलतेचा कल अर्जदाराच्या बाजूने झुकत असल्याचे अर्जदार सिध्द करतो काय? | ..... | होय. |
| २अ) | अनुकूलतेचा कल गैरअर्जदारांच्या बाजूने झुकत असल्याचे गैरअर्जदार सिध्द करतात काय? | ..... | नाही. |
| ३) | मनाई हुकूम मिळाला नाही तर अर्जदाराचे अपरिमित नुकसान होईल हे अर्जदार सिध्द करतो काय? | | होय. |
| ३अ) | मनाई हुकूम मिळाला नाही तर गैर-अर्जदारांचे अपरिमित नुकसान होईल हे गैरअर्जदार सिध्द करतात काय? | ..... | नाही. |
| ४) | आदेश काय ? | ..... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## -: कारणमिमांसा :-

१३. अर्जदाराने त्याची बाजु सिध्द करण्याकरीता मौजा लोणी येथील गट कमांक १३२/२, १३२/१, १३०/१० चे ७/१२ उतारे, खरेदीखत कमांक

२४६१/१६ व खरेदीखत कमांक ११८२/८५ ची प्रत, गट कमांक १३०/९ चा ७/१२ उतारा, सर्व्हे नंबर १३२ चा नकाशा, साक्षीदार केशवराव नामदेवराव मेंढे यांचे शपथपत्र, दिनांक ३१/०५/२०१८ रोजीच्या करारनाम्याची प्रत, साक्षीदार वसंत गणपतराव चिंचमलातपुरे यांचे शपथपत्र, मौजा लोणी येथील शेत शिवार नकाशाची प्रत व साक्षीदार विनायकराव रघुनाथराव उमेकर यांचे शपथपत्र दाखल केले.

१४. याउलट, गैरअर्जदारांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ साक्षीदार रमेश तुळशिरामजी पाचघरे, भास्कर अण्णाजी चिंचमलातपुरे, रामराव भानुजी उघडे, सुनिल शामराव उघडे व रमेश सितारामजी गावंडे यांचे प्रतिज्ञापत्र, गट कमांक १३३/१, १३०/२, १३९/१ चे ७/१२ उतारे हे कागदपत्रं दाखल केले आहेत.

**<u>मुद्दा कमांक १ ते ३अ बाबत</u> :-**

१५. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी चर्चेस्तव एकत्र घेतले आहेत.

अर्जदार व गैरअर्जदार यांचे कथन पाहता त्यांच्या मध्ये शेतीच्या मालकीबाबत कोणताही वाद नसल्याचे दिसुन येते. तसेच हि बाब स्पष्ट होते की, अर्जदाराने शेत शिवार गट नंबर १३२/२ हे.आर ०.९५ आर हि दिनांक ०१/०८/२०१६ रोजी अभिजीत चिंचमलातपुरे यांच्याकडुन खरेदी केली आहे. तसेच शेत सर्व्हे नंबर १३२/१ हे.आर ०.९२ आर हि अर्जदाराच्या वहितीत व ताब्यात आहे. मयत रामकृष्ण यांच्या नावे असलेले शेत सर्व्हे नंबर १३०/१० हे.आर ०.६५ आर हि शेत जमीन अर्जदाराच्या शेताच्या पश्चिमेस आहे.

रामकृष्ण यांच्या मृत्युनंतर वारसाने ती गैरअर्जदारांच्या मालकीची आहे. गैरअर्जदार क्रमांक १ हा इतर गैरअर्जदारांच्या वतीने सदर जमिनीची वहिती करतो.

१६. अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदारांच्या शेत सर्व्हे नंबर १३०/१० मधुन दक्षिणेकडील धु-यालगत ट्रक, ट्रॅक्टर व बैलबंडीच्या वहिवाटीचा पुर्व पश्चिम रस्ता त्याच्या शेतात जाण्याकरीता ३५ ते ४० वर्षा पासुन उपलब्ध आहे. रामकृष्ण व त्यांच्या भावाची शेत सर्व्हे नंबर १३० जमीन होती. त्यापैकी सर्व्हे नंबर १३०/१० च्या उत्तरेस लागुन असलेली शेत जमीन सर्व्हे नंबर १३०/९ हि केशव नामदेवराव मेंढे यांनी रामकृष्ण यांच्या भावाकडुन विकत घेतली आहे. तसेच शेत सर्व्हे नंबर १३०/७ हि वसंत चिंचमलातपुरे यांच्या मालकीची आहे. रामकृष्ण यांच्या शेताच्या दक्षिणेकडील धु-या लगत शेत सर्व्हे नंबर १३२/१ व १३२/२ करीता वहिवाटी रस्ता असल्याकारणाने त्यांच्या वाटणीत ०.६५ आर क्षेत्रफळाची शेत जमीन आली. तसेच शेत सर्व्हे नंबर १३०/७ मधील सामुहिक विहीर असल्या कारणाने ती वाटणी मध्ये ०.६५ आर एवढी देण्यात आली होती. तसेच शेत सर्व्हे नंबर १३०/९ मध्ये वहिवाटी रस्ता किंवा विहीर नसल्याने त्याची वाटणी ०.५८ आर आली होती. सदर बाब गैरअर्जदारांना देखील मान्य असल्याचे दिसुन येते परंतु त्यांनी अर्जदाराच्या वाद रस्त्याने वहिवाटी बाबत हरकत नोंदविल्याचे दिसुन येते.

१७. गैरअर्जदारांच्या कथनानुसार मौजा लोणी येथील शेत सर्व्हे नंबर १३० हि शेत जमीन चिंचमलातपुरे कुटुंबाची आहे. मौजा लोणी येथील शेत सर्व्हे नंबर १३०/१० हे.आर ०.६५ हि शेत जमीन गैरअर्जदार क्रमांक १ ते ४

चे वडीलांच्या हिस्यावर आली होती. गैरअर्जदार कमांक १ व ३ चे संयुक्त मालकीची व ताब्यातील शेत सर्व्हे नंबर १३०/१० चे उत्तरेला राजेराम चिंचमलातपुरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३०/९ हि शेत जमीन होती. ती त्यांनी केशवराव मेंढे यांना विकली आहे. तसेच केशवराव मेंढे यांच्या उत्तरेला सहदेवराव चिंचमलातपुरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३०/८ हि शेत जमीन असुन त्याचे उत्तरेला वसंत चिंचमलातपुरे यांची शेत सर्व्हे नंबर १३०/७ हे शेत असुन त्याच्या उत्तरेला सुजाता चिंचमलातपुरे हिचे शेत सर्व्हे नंबर १३०/५ आहे. त्याचे उत्तरेला सरिता चिंचमलातपुरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३०/५ आहे व त्यामध्ये शेत सर्व्हे नंबर १३०/१ व १३०/३ हे विलीन झालेले आहे व सदर शेत जमीनीचे उत्तरेला भास्कर चिंचमलातपुरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३०/२ हि शेत जमीन आहे. वरील शेत जमीनीतुन जाण्यायेण्या करीता लोणी अलोडा रस्त्याने येवुन उत्तरेकडील शासकीय पडीत जागेमधुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे येवुन त्यानंतर मारोती देवस्थानची शेत सर्व्हे नंबर १२९/२ दक्षिणेकडील धु-याने शेताच्या आतुन पश्चिमेकडुन पुर्वे कडे गैरअर्जदारांचे शेत सर्व्हे नंबर १३०/१० मध्ये आल्यानंतर पुढे शेत सर्व्हे नंबर १३०/१० चे पश्चिमेकडे धु-याने शेताच्या आतुन दक्षिणेकडून उत्तरेकडे बैलबंडीचा ट्रक, ट्रॅक्टर जाण्यायेण्याचा शेत सर्व्हे नंबर १३० चे संपुर्ण पोट हिस्सेदारांचा रस्ता आहे व सदरहु बैलबंडीचा रस्ता सोडल्यानंतर गैरअर्जदारांचे शेत सर्व्हे नंबर १३०/१० चे पश्चिम धु-याला शेताच्या आतमधुन दक्षिण उत्तर पुर्वापार तारेचे कुंपण आहे. तसेच गैरअर्जदारांचे शेताचे पश्चिमेकडील दक्षिण कोप-यामध्ये वरळी आहे. गैरअर्जदारांचे शेत सर्व्हे नंबर १३०/१० व दक्षिणेकडील शामराव भानजी उघडे यांचे शेत सर्व्हे नंबर १३९/१ चे जोड धु-यावर चार मोठी निंभाची व दोन चंदनाची तसेच

इतर जातीची मोठी ६० ते ७० वर्षे वयाची झाडे आहेत. तसेच शेत सर्व्हे नंबर १३९/१ चे उत्तरेकडील पुर्व पश्चिम धु-याला पुर्वापार तारेचे कुंपन आहे.

१८. गैरअर्जदारांच्या शेताच्या दक्षिणेला शामराव उघडे यांचे शेत सर्व्हे नंबर १३९/१ व अनिल उघडे यांचे शेत सर्व्हे नंबर १३९/१अ या शेत जमीनी आहेत. तसेच शेत सर्व्हे नंबर १३९/१अ हि अनील व सुनील उघडे यांनी महादेव मालपे कडुन विकत घेतली आहे. त्याच्या पुर्व धु-याला लागुन रमेश पाचघरे यांचे शेत सर्व्हे नंबर १३३/३ असुन त्याच्या पुर्वेला गंगुबाई मेंढे हिचे शेत सर्व्हे नंबर १३३/१अ आहे. शेत सर्व्हे नंबर १३२ हि उमेकर कुटुंबाची आहे. त्यांच्या ४० ते ५० वर्षापुर्वी आपसी वाटण्या झाल्या आहेत. अर्जदाराचे वडिलोपार्जीत शेत जमीनीचा शेत सर्व्हे नंबर १३२/१ असुन त्याच्या पुर्वेचा हिस्सा सर्व्हे नंबर १३२/२ हा नारायण उमेकर यांचा होता व अर्जदाराने तो विकत घेतला आहे. त्याच्या पुर्वे कडील शेत सर्व्हे नंबर १३२/३ हा भदुजी उमेकर यांचा आहे व त्याच्या पुर्वेचा शेत सर्व्हे नंबर १३२/४ हा बंशी उमेकर म्हणजेच आजचे मोहन उमेकर यांचा आहे. त्याच्या पुर्वेला शेत सर्व्हे नंबर १३२/५ हा सदाशिव उमेकर म्हणजेच आजचे जगदीश उमेकरचा आहे. वरील संपुर्ण शेत सर्व्हे नंबर १३२ मधील उमेकर कुटुंब हे लोणी अलोडा रस्त्याने आल्यानंतर रमेश पाचघरे, गंगुबाई नामदेव मेंढे व शेत सर्व्हे नंबर १३२ चे जगदीश उमेकर यांच्या शेताचे पुर्व धु-याला लागुन दक्षिण उत्तर लोणी अलोढा पांधन रस्ता गेलेला आहे. या रस्त्याने ट्रक व ट्रॅक्टरची शेत सर्व्हे नंबर १३२, १३१ व त्यापुढील संपुर्ण कास्तकारांची आपआपल्या शेत जमिनीमध्ये जाण्यायेण्याची वहिवाट आहे.

१९. जगदीश गजानन उमेकर याच्या सोबत त्याचे काकाचा कौटुंबिक वाद झाल्याने त्याने रस्ता अडविण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे तहसिल कार्यालयाने आदेश करुन जगदीशला शत सर्व्हे नंबर १३२ मधील पोट हिस्सेदारांचा रस्ता अडविण्यास मनाई केली होती. अर्जदाराने अंशतः सदर बाब मान्य केली परंतु त्याच्या शेताच्या वहितीकरीता तहसिल कार्यालया मार्फत आदेश झाल्याचे नाकारले. प्रस्तुत प्रकरणात तहसिलदार यांचा दिनांक २३/०४/१९९७ रोजीचा आदेश दाखल असल्याचे दिसुन येते. त्याचे अवलोकन केले असता गजानन उमेकर यांना गट नंबर १३२/५ ला लागुन असलेले दक्षिण बाजुने अर्जदार भदुजी व मोहन उमेकर यांना त्यांचे शेत गट कमांक १३२/३ मध्ये जाण्याकरीता गट नंबर १३२ व १३३ मधुन जाण्याबाबत अडथळा करु नये असा सर्व्हे नंबर १३२/३ व १३२/४ च्या शेत शेतमालकांना सर्व्हे नंबर १३२/५ मधुन सर्व्हे नंबर १३२/५ च्या दक्षिण बाजुने पुर्व पश्चिम रस्ता वहितीकरीता वापरु दयावा याबाबत आदेश केल्याचे दिसुन येते. परंतु तहसिलदार यांनी सर्व्हे नंबर १३२/१ व १३२/२ च्या वहितीबाबत जगदीश उमेकरला कोणत्याही प्रकारे आदेशीत केल्याचे दिसुन येत नाही. गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदारास त्याच्या शेत सर्व्हे नंबर १३२/१ व १३२/२ करीता देखील सर्व्हे नंबर १३२/३ व १३२/४ प्रमाणेच वहिवाटीचा रस्ता आहे. परंतु सदर बाब कागदोपत्री शाबीत झाल्याचे दिसुन येत नाही.

२०. प्रस्तुत प्रकरणात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता न्यायालयीन आयुक्त यांनी त्यांचा अहवाल नकाशासहित नि.क.१७ वर दाखल केल्याचे दिसुन येते. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये सर्व्हे नंबर १३२/३ व १३२/४ च्या दक्षिण धु-याला लागुन पाणी जाण्याकरीता पुर्व

पश्चिम कोप-यातुन खोल नाली गेल्याचे दिसुन येते. तसेच न्यायालयीन आयुक्त यांच्या कथनानुसार शेत सर्व्हे नंबर १३०/१० व शेत सर्व्हे नंबर १३९/१३अ मध्ये जोड धुरा दिसत नाही व गैरअर्जदारांनी त्यांच्या नकाशात नमुद केल्याप्रमाणे '**व** ते **ड**' पुर्ण शेत नांगरुन पेरले आहे. सदर संपुर्ण अहवालात देखील अर्जदाराच्या सर्व्हे नंबर १३२/१ व १३२/२ करीता लोणी ते अलोडा रस्त्याने सर्व्हे नंबर १३२/५ च्या दक्षिणेकडुन पुर्व पश्चिम वहिवाटी रस्ता असल्याचे नमुद केलेले नाही.

२१. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ दाखल केलेले खरेदीखत कमांक २४६१/१६ व ११८२/८५ चे अवलोकन केले असता त्यामध्ये अर्जदाराने नमुद केल्याप्रमाणे त्याच्या सर्व्हे नंबर १३२/२ च्या वहितीकरीता जाण्यायेण्याचा व बैलबंडीचा रस्ता हा लोणी ते अलोडा पांधनने बंदीतुन शामराव उघडे व मारोती देवस्थानचे शेताच्या धु-याने जोडावरुन रामकृष्ण चिंचमलातपुरे व मालपे यांच्या शेताच्या धु-याने सर्व्हे नंबर १३२/१ चे दक्षिण धु-याने पुर्व पश्चिम असा जुन्या चालत आलेल्या वहिवाटी प्रमाणे आहे असे नमुद केल्याचे दिसुन येते. गैरअर्जदारांच्या कथनानुसार त्यांच्या शेत जमीनीमधुन अर्जदाराने दाव्यात नमुद केल्याप्रमाणे कधीही बैलबंडीचा, ट्रक व ट्रॅक्टरचा रस्ता नव्हता व नाही. तसेच अर्जदाराने शेताच्या जोड धु-यावरुन मागणी केल्याप्रमाणे मोक्यावर रस्ता अस्तित्वात नव्हता व नाही. अण्णा चिंचमलातपुरे यांनी सन १९८५ चे खरेदीखतामध्ये पुर्ण पणे चुकीचा व खोटा रस्ता लिहुन घेतला होता व अभिजीत याने अर्जदाराला दिनांक ०१/०८/२०१६ चे खरेदीखतामध्ये देखील पुर्णपणे चुकीचा व खोटा रस्ता लिहुन दिला आहे. परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल

केलेला नाही. अशा परिस्थितीत, अर्जदाराने दाखल केलेल्या खरेदीखतांवर विश्वास ठेवणे योग्य ठरेल.

२२. गैरअर्जदारांच्या विद्वान वकिलांनी त्यांचे कथन शाबीत करण्याकरीता माननीय उच्च न्यायालयाच्या खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला :

1) **Shamrao Ganpat Chintamani Vs. Kakasaheb Laxman Gorde 2008 (2) Mh.L.J. 819**, wherein it was discussed that at the stage of temporary injunction court can refer to documents which are produced on record without formal proof.

वरील न्यायनिर्णय पाहता प्रस्तुत दाव्यात अर्जदार व गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे जसेच्या तसे अवलोकन करणे योग्य ठरेल.

2) **Baba Hari Mohite and others Vs. Dinkar Ramchandra Sapkar and others, 2007 (2) Mh.L.J. 345**, wherein it was discussed that in a suit for declaration and injunction seeking right of easement, right of easement or easement of necessity is an independent and separate right and every individual can claim it independent of others. Merely because one or few individuals, amongst several, have either not claimed such right or have claimed but their suit has been dismissed for default or as abated , does not mean that the other persons similarly placed would loose their right to file and independent suit or to proceed with their suit claiming such right.

अर्जदाराने प्रस्तुतचा दावा हा उद्घोषणा व त्याअनुषंगाने मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. तसेच त्यामध्ये भारतीय वहिवाट कायदा नुसार तो वहितीत असल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराने प्रस्तुत दावा हा वहीवाटी कायदयाचा आधार घेउन दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात अद्याप पुरावा न्यायपटलावर येणे बाकी आहे. अशा वरिस्थितीत या क्षणी सदर न्यायनिर्णयाची बाधा अर्जदारास येणार नाही.

२३. अर्जदार व गैरअर्जदार यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठयर्थ साक्षीदारांचे शपथपत्रं दाखल केले. सवदह साक्षीदारांनी अर्जदार व गैरअर्जदारांच्या वतीने कथन केल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीत, दाखल कागदपत्रांवर अवलंबुन राहणे योग्य ठरेल. एकंदरीत दोन्ही बाजुंचे म्हणने व दाखल कागदपत्रं पाहता अर्जदारास त्याने नमुद केल्याप्रमाणे सर्व्हे कमांक १३०/१० मधुन दक्षिणे कडील धु-या लगत असलेल्या अर्जदाराच्या शेत सर्व्हे नंबर १३२/१ व १३२/२ करीता असलेली ट्रक, ट्रॅक्टर व बैलबंडीची पुर्व पश्चिम रस्त्याची वहिवाट असल्याचे दिसुन येते तसेच गैरअर्जदार त्याच्या वहितीस अडथळा आणत असल्याचे देखील प्रथमदर्शनी दिसुन येते.

२४. अर्जदार व गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे तसेच माननीय उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता अर्जदाराने प्रथमदर्शनी त्याची बाजु सिध्द केल्याचे दिसुन येते. तसेच अनुकुलतेचा कल देखील त्याच्या बाजुने असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे प्रस्तुत अर्ज नामंजुर केल्यास अर्जदाराचे अपरिमित नुकसान होईल असे देखील स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदाराचा प्रस्तुतचा नि.५ वरील अर्ज मंजुर करणे योग्य होईल. गैरअर्जदारांनी त्यांची बाजु प्रथमदर्शनी शाबीत केल्याचे दिसुन येत नाही त्यामुळे त्यांचा नि.१३ वरील अर्ज नामंजुर करणे योग्य होईल. म्हणुन मुदद्ा कमांक १,२ व ३ चे उत्तर मी **होकारार्थी** देत आहे. तसेच मुदद्ा कमांक १अ ,२अ व ३अ चे उत्तर मी **नकारार्थी** देत आहे.

२५. मुदद्य क.४ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करीत आहे :-

## आदेश.

१. अर्जदाराचा (निशाणी क्रमांक ५) वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तसेच गैरअर्जदारांचा (नि.क.१३) वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

३. गैरअर्जदारांनी स्वतः किंवा त्यांचे प्रतिनिधीमार्फत अथवा इतर कोणा मार्फत मौजे लोणी येथील शेत सर्व्हे कमांक १३०/१० मधुन दक्षिणे कडील धु-या लगत असलेल्या अर्जदाराच्या शेत सर्व्हे नंबर १३२/१ व १३२/२ करीता असलेली ट्रक, ट्रॅक्टर व बैलबंडीची पुर्व पश्चिम रस्त्याची वहिवाट करण्यास कोणत्याही प्रकारे अडथळा किंवा मनाई करु नये असा तात्पूरता मनाई हुकुम देण्यात येत आहे.

४. अर्जाच्या खर्चाचा विचार अंतिम न्यायनिर्णयाचे वेळी करण्यात येईल.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

सही/-
(आर.एस.अडकिणे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
वरुड.

दिनांक २३/१०/२०१८.